'कन्या सुकन्या कर्तव्या''

वुईमेन्स एज्युकेशन सोसायटी, सांगली

# श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली

दिनांक: ०९/०७/२०२५

## सिनिअर व पी जी विद्यार्थिनींनीसाठी शिष्यवृत्ती योजना

## सेंट्रल सेक्टर स्कीम ऑफ स्कॉलरशिप शिष्यवृत्ती २०२५-२६

**http://www.scholarships.gov.in**

महाविद्यालयातील इयत्ता १२ वी मध्ये वर्ष २०२४ - २५ मध्ये पास झालेल्या कला व वाणिज्या विभागात ८० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थिनींसाठी सेंट्रल सेक्टर स्कीम ऑफ स्कॉलरशिप ही शिष्यवृत्ती सन २०२५ - २६ साठी मंजूर करण्यात आली आहे, सदर शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज करायचे असून त्यासाठी **http://www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावरुन ऑनलाईन अर्ज भरून सदर अर्ज व्यवस्थित व योग्य भरल्यानंतर अर्जामध्ये सुचविलेल्या कागदपत्रांची पूर्तता करुन **अर्ज कार्यालयात दिनांक २३ ऑगस्ट २०२५ पर्यंत जमा करणे आवश्यक आहे.**

**ज्या विद्यार्थिनींनी शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ मध्ये फॉर्म भरलेला आहे. त्याच विद्यार्थिनींनी Renewal चा फॉर्म भरता येणार आहे.** सदर अर्ज देण्याची **अंतीम मुदत दिनांक २३ ऑगस्ट २०२५** इतकी राहील उशिरा येणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व होणाऱ्या नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही याची संबंधित विद्यार्थिनींनी नोंद घ्यावी.

**अर्जाबाबत खालील प्रमाणे अटी आहेत.**

१. अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवाशी असावा.

२. अर्जदार इतर कोणतीही शिष्यवृत्ती घेत नसावा.

३. मागील परीक्षेत ८०% पेक्षा जास्त गुण असावेत.

४. पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा ४.५ लाख पेक्षा जास्त नसावी.

५. वडीलांचा उत्पन्नाचा दाखला शैक्षणिक **वर्ष २०२४ - २५** चा आवश्यक आहे.

६. ही शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थीनीं साठी आहे. (दूरशिक्षण विभागाकडे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींना या योजनेचा लाभ घेता येणार नाही याची संबंधित विद्यार्थिनींनी नोंद घ्यावी.)

७. विद्यार्थ्याने राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडणे आवश्यक आहे. (खात्यासोबत आय.एफ.सी. कोड व एम.आय.सी.आर.कोड नंबर देणे आवश्यक आहे) व आधारकार्ड बँक खात्याशी संलग्न केले असलेबाबतचा पुरावा म्हणून बँकेकडून आधार संलग्न केलेबाबतची पावती (आधार सिडींगस्लीप) जोडावी.

**ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थीनींनी उपरोक्त संकेतस्थळाच्या Homepage वरील Guidelines व Frequently Asked Questions (FAQ) वाचून समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा**

**विद्यार्थिनींना सर्व सूचनामहाविद्यालयाच्या (www.mgkanyasangliedu.in) या वेबसाईटवर दिल्या जाणार असल्याने विद्यार्थ्यांनी वेळोवेळी महाविद्यालयाची वेबसाईट पाहणे आवश्यक आहे.**

डॉ. ए. एस. सुगते

प्र. प्राचार्य

I/c. Principal,
S.M.G. Kanya Mahavidyalaya
SANGLI.